गोफ्रूगलतर्फे वित्तीय उत्पादनांच्या

# नव्या 'ईझी सुट'चे बाजारात आगमन

**पुणे :** विभिन्न व्यवसायांच्या विस्तार व प्रगतीसाठी सॉफ्टवेयर पुरवणारी, तसेच भारताची सर्वात वेगाने विस्तारणारी क्लाउड ईआरपी कंपनी गोफ्रूगल ने रिटेल इझी, सर्व्ह इझी आणि मॅनेज इझी या माध्यमातून रिटेल व्यवसाय, रेस्टॉरंट आणि वितरण व्यवसायासाठीच्या नव्या उत्पादनांच्या 'ईझी सुट' अर्थात सुलभ संचांच्या बाजारात आगमन करीत आहे, अशी घोषणा गोफ्रुगलचे सीईओ कुमार वेम्बू यांनी केली. यावेळी रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सीईओ कुमार राजगोपालन प्रमुख अतिथि म्हणून उपस्थित होते. राजगोपालन यांच्या हस्ते यांनी यावेळी एआय आणि एमएल यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा पारंपरिक किरकोळ विक्री उद्योगक्षेत्रात पहिल्यांदाच वापर करणाऱ्या पहिल्यावहिल्या प्रायोगिक डिजिटल स्टोअरचे अनावरण केले.




## 'स्मार्ट प्लॅटफॉर्म' उभारणे हे एकमेव लक्ष्य

वेम्बू पुढे म्हणाले की, पारंपरिक किरकोळ विक्री केंद्रे, रेस्टॉरंट्स आणि वितरण व्यवसायंसाठी कोलॅबोरेटिव्ह कॉमर्सची संकल्पना वास्तवात आणणारा एक 'स्मार्ट प्लॅटफॉर्म' उभारणे हे आमच्या टीमचे एकमेव लक्ष्य आहे. गोफ्रूगलच्या उत्पादनांचा नवा सुलभ संच 'एक्सिपिरियन्स सिमप्लिसिटी' अर्थात सुलभतेचा अनुभव याच मंत्रावर लक्ष केंद्रित करतो. आम्ही सुरक्षित, सर्वंकष, खुल्या आणि परवडण्याजोग्या उपाययोजना देऊ करतो.

## व्यावसायिकांद्वारे ७०० बिलियन डॉलर्सची उलाढाल केली

- वेम्बू म्हणाले की, संशोधन अहवालांच्या आकडेवारीनुसार भारतीय किरकोळ विक्री क्षेत्रातील १४ दशलक्षांहून अधिक किरकोळ व्यावसायिकांद्वारे ७०० बिलियन डॉलर्सची उलाढाल केली जाते.
- या बाजारपेठेच्या एकूण गरजेपैकी ६०-९०% वाटा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांकडून उचलला जातो. किरकोळ विक्रीव्यवसाय आज बदलांच्या उंबरठ्यावर उभा आहे. तर रेस्टॉरंट उद्योग सतत प्रगत होत जाणाऱ्या तंत्रज्ञानाशी बऱ्यापैकी जुळवून घेत आहे.
- क्लाउड किचन्स आणि ऑनलाइन डिलिव्हरी प्लॅटफॉर्ममध्ये होत असलेल्या वाढीमुळे ग्राहक या सेवेला वेगळ्या प्रकारे प्रतिसाद देत असल्याचा प्रत्यय पारंपरिक रेस्टॉरंट्सना पदोपदी येत आहे.
- आज ग्राहकांना केवळ प्रत्यक्ष दुकानांकडूनच नव्हे तर ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि बाजारपेठांकडूनही त्यांच्या वैयक्तिक गरजांकडे लक्ष देणाऱ्या सेवेची, उत्पादनांच्या उपलब्धतेची आणि प्रमाण सेवेची अपेक्षा आहे.
- ग्राहकांच्या वर्तनात अशी उत्क्रांती घडून येत असल्याने व उद्योगक्षेत्राचे स्वरूपही बदलत असल्याने एमएसएमईना आता बंदिस्त वातावरणात राहून काम करता येणार नाही तर त्यांना ईआरपी उपाययोजना वापरून उद्योगाच्या विविध मार्गांशी स्वतःला जोडून घ्यावे लागेल. पारंपरिक एमएसएमई परिघातील किरकोळ विक्री, रेस्टॉरंट आणि वितरण व्यवसायांना लवकरात लवकर हे बदल अंगिकारणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांना आपला व्यवसाय बंद करणे भाग पडेल.

## आधुनिक, चैतन्यपूर्ण बनण्याचा प्रयत्न करावा

राजगोपालन म्हणाले की, पारंपरिक किरकोळ बाजारपेठ आज आधुनिक व्यापारपद्धतीच्या सोबतीने आपले अस्तित्व जपत आहे. हे करताना या क्षेत्राला स्वतःचा चेहरामोहराही बदलून आधुनिक आणि चैतन्यपूर्ण बनण्याचा प्रयत्न करावा लागत आहे. त. गोफ्रूगल सारख्या असे तंत्रज्ञान पुरविणाऱ्या कंपन्या व विस्तारण्याच्या कामी मदत करतील. यामुळे गोफ्रुगलच्या माध्यमातूना व्यावसायिकांनी उत्तुंग यश प्राप्त केले.